| MHBI150009932020 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३१५/२०२० मधील निशाणी क्र.१५ वरील आदेश</u>** |
|---|---|

[०१] प्रस्तुत अर्ज प्रतिवादीने त्याच्याविरुध्द पारीत करण्यात आलेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करुन त्याची कैफियत अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जावरच त्याचे म्हणणे दाखल करत, अर्जास विरोध करत प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा वादींनी वाटपासाठी दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकारांचा विषय आहे. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादीने वेळेत कैफियत सादर केलेली नसल्यामुळे त्याच्याविरुध्द दिनांक १३/०१/२०२१ रोजी विना कैफियतचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. आज रोजी पावेतो दावा हा फार काही पुढे सरकलेला नाही. त्यामुळे मुळ दाव्यावर प्रस्तुत अर्ज मंजुर केल्याचा काहीएक विपरीत परिणाम होणार नाही. यापुढे जाऊन प्रतिवादीस संधी दिल्यास दाव्याचे गुणवत्तेवर अंतिम निराकरण करणे शक्य होईल. दाव्याच्या स्वरुपाचा आणि दोन्ही बाजुच्या पक्षकारांच्या हिताचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज योग्य त्या खर्चाच्या अटीवर मंजुर करणे न्यायोचित होईल. एकुणच वरनमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

(१) निशाणी क्रमांक १५ वरील अर्ज रक्कम रुपये २००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादीच्या विरुध्द पारीत करण्यात आलेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करण्यात येत असुन त्याची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

(३) प्रतिवादीने पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २००/- न्यायालयात जमा केल्यास ती वादींना देण्यात यावी.

(४) यदाकदाचित प्रतिवादीच्या वतीने खर्चाची रक्कम रुपये २००/- भरण्यास कसुर करण्यात आल्यास प्रस्तुतचा अर्ज न्यायालयाच्या स्वतंत्र आदेशाशिवाय आपोआप नामंजुर समजण्यात यावा.

(५) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादीने सोसावा.

Digitally signed by PANKAJ MANMOHAN BIDADA
Date: 2022.02.10 17:24:10 +0530

(पंकज म. बिदादा)

दिनांकः- १०.०२.२०२२. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पाटोदा.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer Grade-3 | : A.D. Bavne, Sd/- |
| Name of the Court | : C.J.J.D. & J.M.F.C., Patoda. |
| Dictated on | : 10/02/2022 |
| Transcribed on | : 10/02/2022 |
| Checked & signed on | : 10/02/2022 |
| Judgment / Order uploaded on | : 10/02/2022 |